MHKO180003322012

**नियमीत दिवाणी दावा क्र.१५२/२०१२ मधील**
**निशाणी क्र.९६ खालील आदेश.**
**(सागर कोळी व इतर वि. सागर आंबी व इतर.)**

वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम VI नियम १७ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. वादींच्या कथनानुसार, त्यांनी प्रस्तुत प्रतिवादींविरुध्द या प्रकरणाव्यतिरीक्त नियमित दिवाणी दावा क्र.१३३/२०१२ व २२४/२०१२ ही प्रकरणे दाखल केली आहेत. प्रस्तुत दावा प्रलंबीत असतेवेळी प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जातील प्रस्तावीत प्रतिवादी क्र.४ व ५ यांच्यासोबत संगनमत करुन प्रस्तुत प्रकरणातील दावा मिळकतीमधील वादींच्या हक्कास बाधा येण्याकरीता दिवाणी न्यायालय, कुरुंदवाड येथे नियमित दिवाणी दावा क्र.१५६/२०१९ हे प्रकरण दाखल करुन सदर प्रकरणामध्ये बेकायदेशीरपणे आपसात तडजोड करुन हुकूमनामा प्राप्त करुन घेतला आहे. सदर हुकूमनाम्याच्या अनुषंगाने प्रस्तुत दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करण्याकरीता वादींना प्रस्तुत अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्याचा गुणानुगूणावर निकाल लावण्याकरीता अत्यंत महत्वाची आहे. प्रस्तुत नमुद दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, सदर दुरुस्ती न केल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात यावा, अशी विनंती वादींच्या विद्यमान वकीलांनी केली आहे.

०३. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी निशाणी क्र.१०७ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जातील मजकूर मान्य व कबूल नसल्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी वैकल्पीकरित्या असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास प्रस्तुतचा अर्ज वीस हजार रुपये इतक्या खर्चासह मंजूर करण्यात यावा.

०४. प्रस्तावित प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी अनुक्रमे निशाणी क्र.११० व १११ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जातील मजकूर मान्य व कबूल नसल्यामुळे प्रस्तुत

अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे. प्रस्तावित प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी वैकल्पीकरित्या असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर करण्यात यावा. प्रस्तावित प्रतिवादी क्र.४ यांनी निशाणी क्र.११८ वर पुरसीस दाखल करुन प्रस्तावित प्रतिवादी क्र.५ यांनी प्रस्तुत अर्जावर दाखल केलेले म्हणणे हेच त्यांचे म्हणणे म्हणून वाचण्यात यावे, असे कथन केले आहे.

०५. दावा, कैफीयत, प्रस्तुत अर्ज, त्यावरील प्रतिवादी क्र.२ व ३ आणि प्रस्तावित प्रतिवादी क्र.४ ते ६ यांनी दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन करण्यात आले. उभयपक्षाच्या विद्यमान वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत दावा प्रलंबीत असतेवेळी प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी व प्रस्तावित प्रतिवादी क्र.४ ते ६ यांच्या दरम्यान दिवाणी न्यायालय, कुरुंदवाड येथे दाखल करण्यात आलेला नियमित दिवाणी दावा क्र.१५६/२०१९ व सदर प्रकरणात पारित करण्यात आलेला हुकूमनामा, या अनुषंगाने प्रस्तुत दाव्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण बाबी दाव्यामध्ये नमूद करण्याकरीता वादींना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. दाव्यामधील प्रस्तावित दुरुस्ती दाव्याचा गुणानुगूणावर निकाल लावण्याकरीता महत्वपूर्ण असल्याचे दिसून येत आहे. तसेच, वादींना प्रस्तुत अर्जामधील प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे व दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, वरील सर्व बाबींचा विचार करता, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर करणे न्यायोचित होईल. वादींना प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब विचारात घेता, प्रस्तुतचा अर्ज दोन हजार रुपये इतक्या खर्चासह मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :-

**:: आदेश ::**

१. प्रस्तुत अर्ज रक्कम रुपये २,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन हजार फक्त) इतक्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२. वादींनी पुढील तारखेपर्यंत दाव्यामध्ये नमुद दुरुस्ती करुन दाव्याची दुरुस्ती प्रत प्रस्तुत प्रकरणात दाखल करावी. तसेच दुरुस्ती दाव्याची प्रत्येकी एक प्रत प्रतिवादींना द्यावी.

३. वादींनी खर्चाची एकूण रक्कम रुपये २,०००/– (अक्षरी रक्कम रुपये दोन हजार फक्त) ही प्रतिवादी क्र.२ व ३ आणि प्रस्तावित प्रतिवादी क्र.४ ते ६ यांना समप्रमाणात द्यावी.

४. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(आदेश खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2025.04.25 18:33:56 +0530

दिनांक : २४.०४.२०२५
कुरुंदवाड.

(बाळासाहेब श्री. गायकवाड)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कुरुंदवाड.